प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

ऑगस्ट 02, 2017

**बँकिंग विनियामक अधिनियम 1949 (एएसीएस) च्या कलम 35अ खाली निदेश - दि भोपाळ नागरिक सहकारी बँक लि., भोपाळ - वाढविलेला कालावधी**

जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येते की, भोपाळ नागरिक सहकारी बँक लि., भोपाळ (मध्यप्रदेश) हयांना दिलेल्या, जानेवारी 25, 2017 च्या निदेशासह वाचित, ऑक्टोबर 29, 2012 रोजी दिलेल्या निदेशाचा कार्यकारी काल, जुलै 31, 2017 पर्यंत वाढविणे, जनतेच्या हितासाठी आवश्यक असल्याबाबत रिझर्व बँकेचे समाधान झाले आहे. त्यानुसार, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 56 सह वाचित, कलम 35अ च्या पोट कलम (1) ने तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँक निदेश देत आहे की, भोपाळ नागरिक सहकारी बँक लि., भोपाळ (एमपी) हयांना, ऑक्टोबर 29, 2012 रोजी देण्यात आलेले निदेश (ज्यांची वैधता शेवटून जुलै 31, 2017 पर्यंत वाढविण्यात आली होती) वरील बँकेला, आणखी सहा महिन्यांसाठी (ऑगस्ट 1, 2017 ते जानेवारी 31, 2018 पर्यंत), जुलै 25, 2017 च्या निदेशांन्वये, पुनरावलोकनाच्या अटीवर लागु असणे सुरुच राहील. संबंधित जनतेच्या माहितीसाठी वरील निदेशांच्या प्रती, बँकेच्या कार्यालयात लावण्यात आल्या आहेत.

आरबीआयने हे निदेश दिले हयाचा अर्थ, आरबीआयने वरील बँकेचा बँकिंग परवाना रद्द केला आहे असा लावण्यात येऊ नये. पुढील अवलोकन करीपर्यंत वरील बँक, बँक-व्यवसाय निर्बंधांसह करणे सुरु ठेवू शकते. परिस्थितीवर अवलंबून हया निदेशांमध्ये बदल करण्याचा विचार आरबीआय करु शकते.

**अजित प्रसाद**

सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/318**